# अनामप्रेम स्नेह - वार्ता

# ANAMPREM NEWS

WWW.ANAMPREM.ORG मासिक पत्रक - मार्च 2025


## ANAMPREM MARCH HIGHLIGHTS





नगर टाइम्स

वर्ष ६० । अंक १३५ । शुक्रवार, १४ मार्च २०२५ (पोस्ट : १५ मार्च २०२५) । पाने ४+भविष्यवेध । मूल्य ₹३


## 'अनामप्रेम'ने केला नवदुर्गांचा सन्मान

### जागतिक महिला दिनानिमित्त आयोजन



अहिल्यानगर (प्रतिनिधी) – अनामप्रेम संस्थेत जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने विविध क्षेत्रात कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या नवदुर्गांचा सन्मान गांधी मैदानातील हिम्मतभवन प्रकल्पात तसेच निंबळक येथील सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात करण्यात आला. संस्थेतील दिव्यांगांनी तयार केलेले नॅपकिन बुके व अनामामृत बहुगुणी थेंब ही उत्पादने देऊन महिलांचा गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमात उषा पाटील (उप आयुक्त, धर्मादाय कार्यालय), कल्पना चव्हाण-गावडे (स.पो.नि. तोफखाना पोलिस स्टेशन), डॉ. सुवर्णा गणवीर, ज्योती पुरी (प्राचार्या), पान २ वर

## अनामप्रेम संस्थेत महिला दिन साजरा

समाचार/नगर-दि.१२



या कार्यक्रमास उषा पाटील (उप आयुक्त धर्मादाय कार्यालय), कल्पना चव्हाण-गावडे (स.पो.नि. तोफखाना पोलीस स्टेशन), डॉ. सुवर्णा गणवीर, ज्योती पुरी (प्राचार्या), छायाताई गेरंगे (सरपंच इसळक), सुजाता पायमोडे (सामाजिक कार्यकर्त्या), गीता महाजन (दिव्यांगांच्या रीडर), संगीता सुसर (कौन्सिलर), वैशाली गादिया, हष्मिता गांधी, शांताबाई पठाडे, निलिमा खरारे (नगरच्या पहिल्या महिला रिक्षा चालक) या सन्मानार्थी उपस्थित होत्या.

यावेळी बोलताना उषा पाटील यांनी जागतिक महिला दिनाच्या स्थापनेचा इतिहास सांगून महिला दिनाचे महत्त्व विशद केले. महिलांनी समाजात वावरताना काय काळजी घ्यावी हे देखील त्यांनी उपस्थित महिला व दिव्यांग विद्यार्थिनींना समजावून सांगितले. स.पो. नि.कल्पना चव्हाण यांनी उपस्थित महिला व दिव्यांग विद्यार्थिनी यांना कायदेविषयक मार्गदर्शन करून सध्या चालू असलेल्या सायबर भामटेगिरी बाबत सावधान केले. डॉ सुवर्णा गणवीर यांनी सद्य परिस्थितीत महिलांचे समाजातील स्थान याबाबत भाष्य केले. यावेळी सुजाता पायमोडे व प्रा.ज्योती पुरी यांची भाषणे झाली.

अनामप्रेम मधील महिला कार्यकर्त्या व कर्मचारी यांचा देखील यावेळी यथोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सुरेखा कोतकर यांनी केले तर सुरेखा राठोड यांनी कार्यक्रमाच्या नियोजनात महत्त्वाची भूमिका निभावली.

कार्यक्रमासाठी डॉ. मेघना मराठे, अनिता माने, इंजि. अजित माने, ॲड. शामभाऊ असावा, ॲड. वैभव साबळे, डॉ. बापूसाहेब कांडेकर, डॉ. रविंद्र सोमाणी, इंजि. राधाताई कुलकर्णी, मा. अभय रायकवाड, मा. स्वाती रानडे, श्री संजय शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. अनामप्रेम टीम मधील रामदास काकडे, विष्णू वारकरी, प्रवीण नवले, विक्रम प्रभू, राहुल खिरोडे, प्रकाश गजे, अक्षय राऊत, सुनील कांबळे, सचिन गारदे, उज्वला फुलसुंदर यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मेहनत घेतली.

## अनामप्रेमने केला सन्मान...

छायाताई गेरंगे (सरपंच इसळक), सुजाता पायमोडे (सामाजिक कार्यकर्त्या), गीता महाजन (दिव्यांगांच्या रीडर), संगीता सुसर (कौन्सिलर), वैशाली गादिया (हितचिंतक), हष्मिता गांधी (सामाजिक कार्यकर्त्या), शांताबाई पठाडे (भाजीपाला व्यावसायिक), निलिमा खरारे (नगरच्या पहिल्या महिला रिक्षा चालक) या महिलांचा सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना उषा पाटील यांनी महिलांनी समाजात वावरताना काय काळजी घ्यावी हे महिला व दिव्यांग विद्यार्थिनींना समजावून सांगितले. स.पो.नि.कल्पना चव्हाण यांनी कायदेविषयक मार्गदर्शन करून सध्या चालू असलेल्या सायबर भामटेगिरीबाबत सावधान केले. डॉ. गणवीर यांनी सद्य परिस्थितीत महिलांचे समाजातील स्थान याबाबत भाष्य केले पायमोडे यांनी संस्थेतील दिव्यांग विद्यार्थ्यांकडून वेगवेगळ्या स्पर्धांची तसेच विविध गुणदर्शन कार्यक्रमाची तयारी करून घेणार असल्याचे सांगितले. प्रा. पुरी यांनी महिलांनी इंग्रजी साक्षर व्हावे असा संदेश दिला. सूत्रसंचलन सुरेखा कोतकर यांनी केले. कार्यक्रमास डॉ. मेधना मराठे, अनिता माने, इंजि. अजित माने, ॲड. शाम असावा, ॲड. वैभव साबळे, डॉ. बापूसाहेब कांडेकर, डॉ. रवींद्र सोमाणी, इंजि. राधाताई कुलकर्णी, अभय रायकवाड, स्वाती रानडे, संजय शिंदे उपस्थित होते. कार्यक्रमासाठी तर सुरेखा राठोड यांच्यासह रामदास काकडे, विष्णू वारकरी, प्रवीण नवले, विक्रम प्रभू, राहुल खिरोडे, प्रकाश गजे, अक्षय राऊत, सुनील कांबळे, सचि




Scanned with OKEN Scanner

# Anamprem News









## अनामप्रेम संस्थेचे अंध विद्यार्थी सौदागर लोंढे यांची UGC-NET परीक्षेत उत्तुंग झेप

गो काष्ठ उत्पादन करिता - गो-उत्पादन प्रकल्पाचे भूमिपूजन सोहळा मा.अरुण शेठ ( भाई ) मा.अविनाश बोपर्डीकर इंजि.अजित माने सह अनामप्रेम परिवार यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न.

**मेलझर केमिकल प्रा.लि.,पुणे या कंपनीच्या सी.एस.आर. फंडातून अनामप्रेमच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात बांधण्यात आलेल्या ५० हजार लिटर क्षमतेच्या आरसीसी टाकीचा उद्घाटन सोहळा संपन्न.**

दृढ इच्छाशक्ती आणि अथक मेहनतीच्या जोरावर अनामप्रेम संस्थेचे माजी अंध विद्यार्थी व सध्या संस्थेत संगीत शिक्षकाची जबाबदारी समर्थपणे पेलणारे सौदागर लोंढे यांनी UGC-NET परीक्षेत यश मिळवले आहे.














अंध,अपंग, अस्थिव्यंग व मूकबधिर या प्रवर्गाच्या शिक्षण, प्रशिक्षण, रोजगार व पुनर्वासनासाठी कार्यरत असलेल्या अनामप्रेम या सामाजिक संस्थेच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात मेलझर केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड, पुणे या कंपनीने आपल्या सी.एस.आर. निधीतून ५० हजार लिटर क्षमतेच्या आर.सी.सी. पाण्याच्या टाकीचे बांधकाम करुन दिले आहे.



Scanned with OKEN Scanner

# ANAMPREM
# MARATHWADA PROJECT

MARCH -2025

## VISITORS

माणुसकी फाउंडेशन हे छत्रपती संभाजीनगर शहरात प्रतिवर्षी "दानउत्सव" कार्यक्रमाचे आयोजन करते या संस्थेचे श्री.मकरंद पटवर्धन व उदय बक्षी यांनी अनामप्रेमच्या मराठवाडा प्रकल्पास भेट दिली.यावेळी त्यांना अनामप्रेम संस्था करत असलेल्या कार्याबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली.





## स्नेहभोजन

संस्थेच्या मराठवाडा प्रकल्पात श्रीमती.प्रज्ञाताई गिरधारी व त्यांच्या कन्या कु. सई यांच्या वतीने भोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

## मराठवाडा प्रकल्पास सस्नेह भेट

25 वर्षा पूर्वी इम्पोर्ट व एक्सपोर्ट चे क्लिअरिंग आणि फॉरवर्डिंग चे कार्य करणारे श्री.जुगलकिशोर मंत्री यांचे जुने साथी श्रीयुत संतोष पंडित व सौ सरिता ताई पंडित यांची अनामप्रेमला सस्नेहभेट.



# ANAMPREM PUNE HOSTEL




Infosys company Hinjawadi, Pune यांच्यामार्फत संस्थेतील गरजू मुलांना व्हीलचेअर ची मदत.



अनामप्रेम संस्था,पुणे प्रकल्पात सर्व विद्यार्थी व कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत होळी सण मोठ्या उत्साहात साजरा.




**अनामप्रेम पुणे वसतिगृहातील अंशतः अंध कु.अनिकेत पाडळे या विद्यार्थ्याने राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत पटकावले प्रथम स्थान..**

जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर कोणतीही मर्यादा अडथळा ठरू शकत नाही, याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला आहे. अमरावती येथे दिनांक 07 मार्च ते 09 मार्च रोजी झालेल्या राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत अंशतः अंध असलेला अनामप्रेमचा विद्यार्थी चि.अनिकेत पाडळे याने अप्रतिम कामगिरी करत प्रथम स्थान पटकावले.



Scanned with OKEN Scanner

## संस्थेच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प,निंबळक येथे नगर तालुक्यातील वेगवेगळ्या गावातील एकूण 70 ग्रामसेवक यांनी संस्थेत भेट दिली. संस्थेमध्ये राबवत असलेल्या वेगवेगळ्या उपक्रमाची माहिती त्यांनी यावेळी घेतली.









## बाल शैक्षणिक सहल उपक्रम अंतर्गत आनंद पार्श्व प्री प्रायमरी स्कूल यांची सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पास भेट







'बाल शैक्षणिक सहल' या उपक्रमांतर्गत आनंद पार्श्व प्री प्रायमरी स्कूल, नवी पेठ, अहिल्यानगर या शाळेच्या मुख्याध्यापिका मा.पुरी मॅडम व त्यांचे सर्व सहकारी शिक्षक यांनी त्या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना अनामप्रेमच्या सत्यमेव जयते ग्राम मध्ये आणून शैक्षणिक सहल पूर्ण केली. या छोट्यांनी संस्थेतील दिव्यांगांनी तयार केलेले नॅपकीन बुके खरेदी केले. सर्व मुलांची सहली खूप आनंददायी झाली असे प्रतिपादन त्यांच्या शिक्षकांनी केले.



Scanned with OKEN Scanner

## जिल्हा परिषद अहिल्यानगर आणि उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान आयोजित अनामप्रेम उत्पादने स्टॉल लावण्यात आला.







जिल्हा परिषद अहिल्यानगर आणि उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान आयोजित  भव्य प्रदर्शनामध्ये जाऊन सर्व महिला बचत गटाला सॅनिटरी पॅड संदर्भात माहिती दिली  तसेच तेथील महिला गटाच्या प्रमुख महिला यांच्याशी संवाद साधला.







साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या व अपंगांचे आयडॉल असलेल्या सोनाली नवांगुळ यांनी अनामप्रेमच्या यशवंत प्रकल्प येथील स्पायनल कॉर्ड इंजुरी रिहॅब सेंटर येथे व सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प येथे सदिच्छा भेट दिली.



नगर तालुक्यातील अती दुर्गम भागातील अपंगाना अनामप्रेम मार्फत आवश्यक किराणा मदत चे वाटप कार्यक्रम पूर्ण.



Scanned with OKEN Scanner

# Visitors













# School Activities










अनामप्रेम संस्थेत जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने विविध क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या नवदुर्गांचा सन्मान अनामप्रेम संस्थेच्या गांधी मैदानातील हिम्मतभवन प्रकल्पात तसेच निंबळक येथील सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात संस्थेतील दिव्यांगांनी तयार केलेले नॅपकिन बुके व अनामामृत बहुगुणी थेंब ही उत्पादने देऊन मोठ्या उत्साहात करण्यात आला.



Scanned with OKEN Scanner





'बाल शैक्षणिक सहल' या उपक्रम अंतर्गत पार्श्व प्री प्रायमरी स्कूल नवी पेठ,अहिल्यानगर येथील मुख्याध्यापिका मा.पुरी मॅडम व त्यांचे सर्व सहकारी शिक्षक आणि हे छोटे बाल कलाकार यांची सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पास भेट.

## युथ फॉर जॉब व अनामप्रेम संस्था अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने माजी विद्यार्थी दिव्यांग मेळावा दिनांक 22 मार्च रोजी मोठ्या उत्साहात संपन्न..











Scanned with OKEN Scanner

# AVANI

## साई चरणी सापडलेल्या कु. अवनीची शिर्डीतून अनामप्रेम मार्गे पुण्यापर्यंतची प्रेरणादायी यात्रा

**ही गोष्ट आहे एका निरागस, गोंडस बालिकेची, जिचे नाव आहे अवनी..**

**माणसं जन्माला येतात,**
**पण या माणसांच्या पोटी-**
**" माणुसकी"**
**जन्माला येईलच याची,**
**शाश्वती या युगात नाही.....!**

या उक्तीप्रमाणे कु. अवनी ही नवजात बालिका कोपरगाव तालुक्यातील शिर्डी देवस्थानाच्या पायरी वरती 17 सप्टेंबर 2011 रोजी सापडली. त्यावेळी अवनी अक्षरशः एक दिवसाचे बाळ होते. कोपरगाव तालुक्यातील शिर्डी येथील साईबाबा देवस्थानचे पुजारी पहाटे पाचच्या दरम्यान पूजा करण्यासाठी मंदिरात जात असताना त्यांना मंदिराच्या पायरी वरती रडणाऱ्या बाळाचा आवाज ऐकू आला. तेथे त्यांना एक दिवसाचे बाळ दिसले. पुजारी काका एकदमच आश्चर्यचकित झाले. त्यांनी इकडे तिकडे पाहिले परंतु त्यांना जवळपास कोणीही दिसले नाही. त्यांनी बाळाला उचलून घेतले आणि शांत केले व त्याचे आई-वडील कुठे दिसतायेत का याचा शोध घेऊ लागले. बघता बघता दिवस उजाडला. सकाळचे सात वाजले. परंतु तिथे कोणीच आले नाही अगदी बाळाचे आई-वडीलही सुद्धा...

**कुणीतरी हवं होतं जीवनात साथ देणारं,**
**कुणीतरी हवं होत जीवाला जीव देणारं,**
**चुका झाल्या तर मायेने समजावणारं,**
**कुणीतरी हवं होतं या बालिकेला आपलेपण देणारं....**

एव्हाना ही बालिका बेवारस असल्याचे पुजाऱ्यांच्या लक्षात आले. आणि त्या पुजारी काकांनी तात्काळ गावच्या सरपंचाशी संवाद साधला व सरपंचांना सर्व हकीगत सविस्तर सांगितली. सरपंच व गावकरी यांनी मिळून अवनी हिला नगरमधील स्नेहालयच्या बालभवन प्रकल्पामध्ये दाखल केले. बघता बघता अवनी दोन वर्षांची झाली. एके रात्री अवनीला खूप ताप आला, प्राथमिक औषधोपचार करुन सुद्धा ताप कमी होत नव्हता. त्यामुळे अवनीला दवाखान्यात ॲडमिट करण्यात आले परंतु अवनीचा ताप काही केल्या कमी होईना. तिचा तो ताप तिच्या मेंदूत गेला आणि त्याचा दुष्परिणाम होऊन अवनी मतिमंद झाली. त्यातच तिला अर्धांगवायुसारखा आजार जडला. त्यामुळे तिला चालता येणे अशक्य झाले आणि दुर्दैवाने ती अस्थिव्यंग सुद्धा झाली. अवनीला आता विशेष काळजी वाहकाची व फिजिओथेरपीची गरज होती. स्नेहालय संस्थेची भगिनी संस्था अनामप्रेम संस्थेत अस्थिव्यंग व अंध मुलांची व्यवस्था असल्याने सन 2014 मध्ये अवनीला अनामप्रेम संस्थेमध्ये दाखल करण्यात आले. त्यावेळी अवनी साधारणतः दोन वर्षांची होती. अनामप्रेम मध्ये अवनीचे व्यवस्थित संगोपन करण्यात आले. तिला फिजिओथेरपी देण्यात आली. त्याचबरोबर शाळेत देखील दाखल करण्यात आले. सध्या अवनी बारा वर्षांची झाली आहे.

**अनामप्रेम संस्थेमध्ये आल्यानंतर अवनीत झालेले सकारात्मक बदल..**

अवनी आता स्वतः स्वतःच्या पायावर उभी राहू शकते. स्वतःचे दैनंदिन कामे स्वतः करते. इतरांच्या मदतीने ती चालते सुद्धा. त्याचबरोबर अवनीला गायनाचीही खूप आवड आहे. आणि तिचे पाठांतरही उत्तम आहे. अशा अनेक कला अवनीने अवगत केल्या आहेत.




या उक्तीप्रमाणेच अवनीचा जीवन प्रवास आहे. अवनी जवळपास 11 वर्ष अनामप्रेम संस्थेत राहिली आणि तिने स्वतःला या संस्थेतच विकसित केले. त्यामुळे अनामप्रेम संस्था ही तिची मातृसंस्थाच आहे .

थोडक्यात काय तर शिर्डी हे संपूर्ण भारतभरातील श्रद्धास्थान, परंतु येथेच एका अंधारमय कोपऱ्यात कु. अवनी नावाचे नवजात बाळ अनाथ अवस्थेत सापडले. कोणी सोडून गेले? का गेले? याचा काहीच थांगपत्ता लागला नाही. परंतु, या निष्पाप बाळाचे नशीब मात्र दैवाने ठरवले होते—तिला आधार देण्यासाठी अनेक हात पुढे सरसावले. असे म्हटले जाते की **देव तारी; त्याला कोण मारी**... अवनीचा प्रवास सर्वप्रथम बालगृह त्यानंतर स्नेहालय आणि नंतर अनामप्रेम असा झाला. या प्रवासामध्ये अवनीसाठी प्रत्येकाने अतोनात कष्ट घेतले आणि अवनीच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न केले.

**शब्दांपेक्षा कृतीशील मदत महत्त्वाची**

शिर्डीतील स्थानिक प्रशासन आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी अवनीला आरोग्य तपासणीसाठी रुग्णालयात दाखल केले. तिची प्रकृती सुधारल्यानंतर तिच्या पुढील जीवनाची सुरुवात करण्यासाठी योग्य संस्था शोधली. अवनीच्या पालनपोषणाची, संगोपनाची सर्व जबाबदारी अनामप्रेम संस्थेने उचलली आणि फक्त जबाबदारीच नाही तर अनामप्रेम संस्थेच्या त्रिसूत्रीनुसार (म्हणजे शिक्षण 'प्रशिक्षण आणि पुनर्वसन) या तत्त्वानुसार अनामप्रेम संस्थेने अवनीला शिक्षणही दिले आणि तिच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न चालू केले. अवनी आता तरुणपणात येत असल्याने तिच्या भविष्याचा विचार करून तिला एखाद्या चांगल्या मतिमंद सुधारगृहात पाठविण्यासाठी अनामप्रेमने बालकल्याण समिती मार्फत अनेक संस्थांशी पत्र व्यवहार केले. यासाठी डॉक्टर मेघना मराठे यांनी बरेच प्रयत्न केले परंतु अनेक संस्थांनी वेगवेगळी कारणे देऊन अवनीला घेण्यास नकार दिला.



Scanned with OKEN Scanner

अनामप्रेमचे पालक डॉ. प्रकाश शेठ सर यांनी याप्रकरणी विशेष लक्ष देण्याचे ठरविले आणि यांच्या माध्यमातून पुणे येथील काही संस्थांमध्ये प्रयत्न करण्यात आले. सरते शेवटी त्यांच्या प्रयत्नांना यश आले आणि सामाजिक कार्यकर्त्या डॉ. प्राजक्ता कोळपकर यांच्याशी त्यांचे अवनी बाबत बोलणे झाले. आणि डॉक्टर प्राजक्ता कोळपकर यांच्या 'प्रा फाउंडेशन, पुणे' या अपंग व विशेषत: मतिमंद प्रवर्गासाठी कार्य करणाऱ्या सामाजिक संस्थेमध्ये 19 मार्चला अवनीला प्रवेश मिळाला. सुरुवातीला त्यांनी 8 दिवसांसाठी प्रायोगिक तत्त्वावर अवनीला ॲडमिशन दिले. मात्र 8 दिवसानंतर त्यानी अवनीचा आनंदाने स्विकार केला. अवनीला चालू असलेल्या औषधोपचारासाठी तसेच तिच्या इतर वैयक्तिक गरजांसाठी दरमहा काही रकमेची आवश्यकता असल्याने अनेक देणगीदारांना आवाहन करण्यात आले. या आवाहनाला त्वरित प्रतिसाद देत नोबेल हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर, अहिल्यानगरचे निष्णात डॉक्टर श्री बापूसाहेब कांडेकर सरांनी अवनीचे एक वर्षाचे पालकत्व स्वीकारले.

**जर नाजूक पाखरु देखील,**
**अपार मेहनत करून ..**
**घरटे बांधू शकतो ..!**
**तर आपण स्वप्न साकारण्यासाठी ,**
**का मागे हटायचं....**
**कष्ट हेच यशाचं घरटं उभं करतात...!**

अवनीचे पुनर्वसन हे अनामप्रेम संस्थेचं स्वप्न होतं आणि ते साकार करण्यासाठी संस्थेने अतोनात प्रयत्न केले आणि संस्थेच्या प्रयत्नाला आलेले यश म्हणजे अवनीसाठी मिळालेली पुण्यातील संस्था.....
'प्रा फौंडेशन'
या विश्वसनीय पुनर्वसन केंद्रात अवनीला दाखल करण्यात आले. येथे तिच्या संगोपनासाठी प्रेमळ हात पुढे आले. शिक्षण, आरोग्य, आणि सुरक्षित वातावरण नक्कीच अवनीला येथे मिळणार आहे .

**एक नवी संधी, एक नवीन सुरुवात**:--

आज अवनी एका आनंदी आणि सुरक्षित वातावरणात वाढत आहे. तिच्या चेहऱ्यावरचे निरागस हास्य हेच तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभसंकेत आहेत. या संपूर्ण प्रक्रियेत सहभागी झालेल्या प्रत्येक व्यक्तीने दाखवलेली संवेदनशीलता आणि जबाबदारी ही समाजासाठी प्रेरणादायी ठरली आहे.

असे म्हटले जाते की,

**स्वप्न ती नव्हेत जी झोपेत पाहिली जातात,**
**स्वप्न ती असतात--**
**जी तुम्हाला झोपू देत नाहीत....**

आणि खरोखरच अवनीच्या पुनर्वसनासाठी अनामप्रेम संस्थेने जागेपणी पाहिलेले स्वप्न आज साकार झाले आहे, सत्यात उतरले आहे. आज एका चांगल्या संस्थेमध्ये अवनीचे पुनर्वसनही झाले आहे.

अवनी ही केवळ एक घटना नाही, तर हे उदाहरण आहे—संवेदनशीलतेचे, जबाबदारीचे आणि एका नवजात जीवाला नव्या जगण्याची संधी देणाऱ्या सकारात्मक बदलाचे. थोडा वेळ लागतो पण आपल्याला हवी असलेली गोष्ट... आपल्याकडे योग्य वेळ आल्यावर बरोबर येत असते.

**उपरवाले की न्याय की ,**
**चक्की धिमी जरूर चलती है ;**
**लेकिन ये याद रखना ,**
**पिस्ती बहुत बारीक है....!**

उशिरा का होईना पण अवनीचे उत्तम प्रकारे पुनर्वसन झाले आणि आता ती तिच्या पुढील भविष्यासाठी आनंदात सज्ज झालेली आहे.







Scanned with OKEN Scanner

# ANAMPREM SKILL DEVELOPMENT CENTRE
# UDYOG BHAVAN

# Anamprem Products




## 1. Napkin bouquet

"दिव्यांग बांधवांनी तयार केलेले नॅपकिन बुके विक्रीसाठी उपलब्ध - त्यांच्या कौशल्याला प्रोत्साहन द्या, आणि विशेष उपक्रमात सहभागी व्हा!"

## 2.Sathi chappal udyog

दिव्यांग बांधवांनी आत्मनिर्भरतेच्या दिशेने टाकलेलं महत्त्वाचं पाऊल - त्यांनी तयार केलेल्या साथी चप्पल विक्रीसाठी उपलब्ध आहेत.
आपल्या खरेदीतून त्यांना प्रेरणा आणि आधार मिळेल.
कृपया पुढे येऊन हे उत्पादने खरेदी करा आणि त्यांच्या मेहनतीस हातभार लावा!








## 3. Gir Cow Lonkadh Ghee

अनामप्रेम संस्थेच्या गोशाळेत पारंपरिक पद्धतीने तयार केलेले शुद्ध तूप आता विक्रीसाठी उपलब्ध आहे.
हे तूप केवळ दर्जेदारच नाही, तर संस्थेच्या सेवाभावी कार्यासही मदतीचे हात देणारे आहे.
कृपया हे तूप खरेदी करून सेवेसोबत स्वादालाही साथ द्या.!



## 4. Bahuguni Anamamrut

अनामप्रेम संस्थेचे "अनामामृत बहुगुणी थेंब" आता विक्रीसाठी उपलब्ध!
दिव्यांग बांधवांनी तयार केलेले... नैसर्गिक, सुरक्षित आणि बहुगुणी!
उपयोग:
सर्दी, खोकला, कफ, अपचन, दाढदुखी यावर गुणकारी
माऊथ फ्रेशनर म्हणूनही उत्तम!
आरोग्यवर्धक थेंब... सेवाभावातून तयार!





## 5. Sanitary Pad

स्वच्छतेची काळजी, सन्मानाची साथ!
अनामप्रेम संस्थेच्या उद्योग भवनात दिव्यांग बांधवांनी तयार केलेले सॅनिटरी पॅड्स आता विक्रीसाठी उपलब्ध
आहेत. हे पॅड्स सुरक्षित आणि आरोग्यदायी असुन स्त्रियांसाठी त्यांची खरीखुरी सखीच आहेत. स्वावलंबनाचं प्रतीक!



अनामप्रेम दिव्यांगनिर्मित उत्पादने मिळवण्याकरिता व अधिक माहितीसाठी संपर्क -7350013805

www.anamprem.org

Scanned with OKEN Scanner



# धन्यवाद...

# अनामप्रेम परिवार

| | |
|---|---|
| • बँकेचे नांव<br>Bank Name | सेंट्रल बँक ऑफ इंडिया<br>Central Bank of India |
| • शाखा<br>Branch | अहमदनगर (महा)<br>Ahmednagar (MH) |
| • खाते क्रमांक/A/c No. : 3486669726 | |
| • आय.एफ.एस.सी.कोड/IFSC Code : CBIN0280670 | |

ANAMPREM

10252110@cbin

## ANAMPREM CONTACT DETAILS

- Himmat Bhavan Project - 7350013806 , 9011004576
- S.J Gram Project - 7350517778 , 9011670123
- Marathwada Project. - 9921509199 , 9011750035
- Anamprem Pune Hostel. - 9422307116 , 9011750022

**हे मासिक पत्रक मा.अध्यक्ष अनामप्रेम गांधी मैदान, अहिल्यानगर येथून प्रकाशित केले आहे.**